ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अंमलबजावणीमुळे प्रचलित शिक्षण व्यवस्थेत होणारे संभाव्य बदल



डॉ. युवराज सुरवसे
संशोधक मार्गदर्शक(डॉ. एम.ए. पी.एच.डी., सेट)
छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स , जिल्हा सोलापूर
भूमिका महेश क्षीरसागर
संशोधक विद्यार्थिनी एम. ए. डी.एड. छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज
ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स , जिल्हा सोलापूर

## गोषवारा :

भारत देशाच्या शैक्षणिक वाटचालीचा अभ्यास पाहता गुरुकुल परंपरा ही भारतातील शिक्षण देणारी मूलभूत पद्धती होती, असे सर्व वाङ्मयाचे सार सांगते. त्यानंतर अनेक परकीय आक्रमणे भारतावर झाली. परंपरेने देशात राजश्रयाने विस्तारलेल्या मोठमोठ्या तक्षशिला, नालंदा यासारख्या विद्यापीठांची अधोगती झाली. ब्रिटिशांच्या कारकिर्दीत सन 1913 रोजी लॉर्ड मेकॉले यांनी सुचवलेल्या पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण ख्रिश्चन मिशनऱ्याद्वारे देण्यात येऊ लागले. स्वातंत्र्य चळवळी दरम्यान अनेक समाजसुधारकांनी त्याचे दुष्परिणाम ओळखून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. देश स्वतंत्र झाल्यानंतर सादर केलेले १९६८ रोजी पहिले स्वतंत्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कोठारी आयोगाच्या शिफारशीवर आधारित होते.यात 14 वर्षापर्यंतच्या बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा विचार मांडण्यात आला होता. त्यानंतर शिक्षणातील स्त्री पुरुष तसेच समाजातील इतर घटकांनाही शिक्षणाची समान संधी यावर विशेष भर देणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 साली मांडण्यात आले। आता जागतिकीकरणाच्या या स्पर्धेत देशाची शिक्षण व्यवस्था लक्षात घेऊन शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 सादर केले आहे. शालेय शिक्षणापासून तेमहाविद्यालयीन शिक्षणापर्यंत अनेक बदल या धोरणामुळे प्रचलित शिक्षण व्यवस्थेत झाल्याचे तज्ञांचे मत आहे या बदलणाऱ्या संभाव्य बाबींचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

**बीजशब्द :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, एन. इ. पी., ओ. डी. एल. (ओपन अँड डिस्टन्स लर्निंग), होलिस्टिक हेल्थ, कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.),एच. पी. सी.( होलिस्टिक प्रोग्रेस कार्ड),परख (परफॉर्मन्स असेसमेंट रिव्यू अँडअनॅलिसिस ऑफ नॉलेज फॉर होलिस्टिक डेव्हलपमेंट),SQAAF (स्कूल क्वालिटी असेसमेंट अँड अॅशुरन्स फ्रेमवर्क ), मुक्त विद्यापीठ, इ. सी. सी. इ.( अर्ली चाइल्ड केअर एज्युकेशन ).

## प्रस्तावना :

जागतिकीकरणाची प्रक्रिया ही मानवाच्या सर्व क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणत असल्याचे निदर्शनास येत आहे. आर्थिक, भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक या क्षेत्रांप्रमाणेच या जागतिक स्तरावरील बदलांचा परिणाम म्हणून मानवाच्या शिक्षण क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. तो व्हायलाच हवा. कारण स्पर्धेच्या युगामध्ये जागतिक स्तरावर विविध क्षेत्रांमध्ये होणाऱ्या अमुलाग्र बदलांना व नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी व शिक्षक हे सक्षम असणे गरजेचे आहे. आपल्या राष्ट्रातील नागरिक सक्षम करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे 'शिक्षण'. याच उद्देशाने भारत देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण विषयक धोरण ठरवण्यासाठी पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 रोजी तर दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 रोजी राबविण्यात आले. याच धोरणात काही बदल करून 1992 साली ते आज पर्यंत राबवले जात आहे. मागील 34 वर्षांपासून काही किरकोळ योजना वगळता शिक्षण धोरणात विशेष बदल केले गेले नव्हते. याउलट 21 व्या शतकातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक गरजा मात्र वेगाने बदलत आहेत. भविष्यकालीन आव्हाने व वर्तमानकालीन जीवन सुसह्य व प्रगत होण्यासाठी येणाऱ्या संधीचा उपयोग करून जीवनमान उंचावण्यासाठी नागरिकांना कुशल बनवणे अत्यंत गरजेचे आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात करण्यास राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे यांनी सुरुवात केलेली आहे. त्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक धोरण 2020 मुळे 34 वर्षांपासून सुरू असलेल्या शिक्षण प्रक्रियेत जे काही बदल होणार आहेत. अशा ठळक बाबींचा अभ्यास या संशोधनाद्वारे मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

## उद्देश:

1) जुने शैक्षणिक धोरण व नवीन शैक्षणिक धोरण यातील शिक्षण प्रणालींचा विचार करणे.
2) अभ्यासक्रमाच्या स्वरूपातील बदलांचा अभ्यास.
3) नवीन शैक्षणिक धोरणामुळे बदलणारी शैक्षणिक संरचना / आकृतीबंध याचे स्वरूप स्पष्ट करणे.

4) शिक्षण प्रक्रियेतील प्रचलित मूल्यमापन पद्धती व नवीन धोरणानुसार येणारी मूल्यमापन पद्धती अर्थात समग्र प्रगती पत्र याची ओळख.
5) शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास ( सीपीडी ) आणि शिक्षक शिक्षणाचे बदलते स्वरूप यांची माहिती घेणे.
6) शाळा गुणवत्ता मूल्यांकन प्रणाली स्वरूप यामधील नाविन्य.

## मुक्त शिक्षण प्रणालीचा विचार :

भारतासारख्या विशाल आणि विविधता असलेल्या देशातील नागरिकांचा विकास हा केवळ शिक्षण आणि शिक्षणामुळे शक्य आहे. त्यामुळे एकंदरीत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नागरिकांच्या शिक्षणावर भरदेणारे धोरणच संबंधित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मध्ये देखील अंतर्भूत करण्यात आले होते. तसेच स्त्रियांच्या व मुलींच्या शिक्षणाची टक्केवारी पाहता नंतरच्या 1992 च्या धोरणात स्त्रिया व मुलींच्या शिक्षणाला महत्त्व देऊन पूरकयोजना कार्यान्वित करण्यात आल्या. तर आता एकविसाव्या शतकातील आव्हाने व स्पर्धा लक्षात घेऊन तज्ञ मंडळींनी या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मुक्त शिक्षण प्रणालीचा स्वीकार केलेला दिसून येतो. त्यामुळे सामाजिक, आर्थिक दृष्ट्या वंचित घटकांवर विशेष भर दिला आहे शिक्षणाची व्याप्ती विस्तृत करून औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही शिक्षण पद्धती अंतर्भूत करण्यात आल्यामुळे प्रत्यक्ष शाळेत उपस्थित राहू न शकणारे विद्यार्थीही आपले शिक्षण पूर्ण करू शकतील. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलआणि स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूल यांच्याद्वारे दिले जाणारे मुक्त आणि दुरस्थ शिक्षण कार्यक्रम ( ओपन अँड डिस्टन्स लर्निंग ) अधिक विस्तृत व बळकट केलेले दिसून येतील.

## अभ्यासक्रमाचे बदलते स्वरूप :

प्रचलित अभ्यासक्रमात असलेला परिसर अभ्यास हा विषय नवीन राष्ट्रीय शैक्षणीक धोरणात T.W.A.अर्थात वर्ल्ड अराऊंड अस या नावाने अंतर्भूत करण्यात आला आहे.आजकालच्या वेगाने बदलणाऱ्या जगात एक चांगली, यशस्वी, नाविन्यपूर्ण बदलांशी जुळवून घेणारी आणि निर्णयक्षम व्यक्ती होण्यासाठी अभ्यासक्रमातील या बदलांचा उपयोग होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मूल्यांची रुजवणूककरून सर्वांगीण विकास साधणारा प्रचलित अभ्यासक्रम हितावह होताच परंतु या स्पर्धेच्या युगात वैज्ञानिक वृत्ती आणि कल्पकता आणि नाविन्यपूर्णता, सौंदर्यशास्त्र आणि कलेची समज, मौखिक आणि लेखी संवाद साधण्याची कला,स्वास्थ्य आणि पोषण, शारीरिक शिक्षण, तंदुरुस्ती, आरोग्य आणि क्रीडा सहयोग आणि सांघिक भावना, समस्या सोडवणे आणि तार्किक विचार करणे, व्यावसायिक अनुभव आणि कौशल्य, डिजिटल ज्ञान, कोडींग आणि संगणकीय विचार,नैतिक विचार, मनुष्य आणि घटनात्मक मूल्यांचे ज्ञान आणि अभ्यास, लैंगिक

संवेदनशीलता, मूलभूत कर्तव्य, नागरिकत्व विषयक कौशल्य, भारताविषयी ज्ञान, साधनसंपत्तीच्या संरक्षणासह पर्यावरणाविषयी जागरूकता, देश आणि जगाला भेडसवणाऱ्या गंभीर समस्यांचे ज्ञान अशा क्षमता वृद्धिंगत करण्यास पूरक अभ्यासक्रम 2025- 26 च्या शैक्षणिक वर्षापासून टप्प्याटप्प्याने लागू केला जाईल. यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, डिझाईन थिंकिंग, सर्वांगीण आरोग्य (हॉलिस्टिक हेल्थ ),ऑरगॅनिक लिविंग अर्थात पर्यावरण शिक्षण, जागतिक नागरिकत्व शिक्षण यासारख्या विषयांचा अंतर्भाव देखील टप्प्याटप्प्याने होईल.

## शैक्षणिक संरचना आकृतीबंध :

तज्ञ समितीच्या मार्गदर्शनाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार पूर्वीच्या शैक्षणिक संरचनेत अमुलाग्र बदल होणार आहे. प्रचलित शिक्षण संरचना ही 5+5+2 अशी आहे. परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार त्याचे स्वरूप **5+3+3+4** असे होईल. कारण तज्ञांच्या अभ्यासानुसार बालकांचा 75% विकास हा वय वर्षे तीन ते पाच पर्यंत होत असतो. हा विकासाचा टप्पा फार महत्त्वपूर्ण असल्याने पूर्वीचे बालकाचे शाळा प्रवेशाचे वय सहा वर्षे हते. आता तीन वर्ष असेल बालवाटिका एक मध्ये तीन वर्षे पूर्ण झालेल्या बालकाला प्रवेश दिला जाईल. प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाचा मजबूत पाया ( ई.सी.सी.ई) याधोरणात समाविष्ट केला आहे.

## नवीन शैक्षणिक धोरणानुसार मूल्यमापनातील परिवर्तन :

शिक्षणामुळे बालकाचा सर्वांगीण विकास साधणे हेच शिक्षण प्रक्रियेचे ध्येय आहे. परंतु काळानुरूप यात दिसून येणाऱ्या त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास अधिक कार्यक्षम स्वरूपात मांडण्यासाठी या नवीन धोरणात मूल्यमापन पद्धतीत बदल केल्याचे दिसून आले आहे. दहावी व बारावी साठी बोर्ड परीक्षा सुरू ठेवल्या जातील पण समग्र विकासास प्रोत्साहित करण्यासाठी बोर्ड परीक्षांची नव्याने रचना केली जाईल. सध्या सुरू असलेल्या संकलित मूल्यमापनाऐवजी नियमित आणि अकारिक मूल्यमापन केले जाईल. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आणि मूल्य निर्धारण करण्यासाठी निकष, मानके आणि मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी **PARAKH** या एका नवीन राष्ट्रीय मूल्यांकन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे एक सर्वांगीण व्यापक बहुआयामी अहवाल निर्देशित करणारे प्रगती पत्रक हे देखील या धोरणामुळे येणाऱ्या काळात पहावयास मिळेल. त्यामुळे शैक्षणिक वर्षांमध्ये होणाऱ्या स्वतःच्या विकासावर विद्यार्थ्यांना लक्ष ठेवता येईल. विद्यार्थ्यांना त्यांची कुवत, आवडीची क्षेत्र आणि लक्ष केंद्रित करायची गरज असलेली क्षेत्रे याविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळेल. या सर्वांचा परिणाम म्हणून ते स्वतःसाठी करियरचे सर्वोत्कृष्ट पर्याय निवडण्यात यशस्वी होतील.

## शिक्षकांचा सातत्यपूर्ण विकास आणि शिक्षक शिक्षणाचे बदलते स्वरूप :

प्रचलित शिक्षण पद्धतीत अध्यापन शास्त्र ही पदवी प्राप्त व्यक्तींना प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्त केल्याचे आपण पाहतो परंतु उच्च गुणवत्ता असलेले शिक्षक व अध्यापन शास्त्रातील प्रशिक्षण या बाबी लक्षात घेऊन बी.एड., एम.एड. आणि पीएचडी पदवी देणारे उच्च दर्जाचे शिक्षण शिक्षकांना देऊन त्यांच्या सक्षमीकरणाचा उद्देश या धोरणाने साध्य केला जाईल. सन 2030 पर्यंत अध्यापनासाठी लागणारी किमान पात्रता चार वर्षांच्या बीएड कोर्सची असेल. या एकात्मिक बीएडच्या पदवीमध्ये ज्ञानसामग्री आणि अध्यापन शास्त्र विषयी विस्तार पूर्वक शिक्षण दिले जाईल. या चार वर्षांची एकात्मिक बीएड पदवी उपलब्ध करून देणारी संस्थाच विशेष पदवी मिळवलेल्या व्यक्तींना दोन वर्षांचे बीएड उपलब्ध करून दिले जाईल. तसेच वर्षांच्या बहुशाखिय बॅचलर पदवीस समकक्ष असणारी पदवी किंवा एखाद्या विशिष्ट क्षेत्रांमध्ये मास्टर्सची पदवी मिळवलेल्या व्यक्तीसाठी एक वर्षांच्या बीएड अभ्यासाची तरतूद देखील या शिक्षण धोरणानुसार उपलब्ध होईल. याशिवाय दूर किंवा दुर्गम राहणारे विद्यार्थी तसेच सेवेत असलेले शिक्षक आपली पात्रता वाढवण्याची उच्च दर्जाचे बीएड अभ्यासक्रम मिश्र किंवा दुरस्थ शिक्षण ( ओपन अँड डिस्टन्स लर्निंग ओडियल ) या स्वरूपात पूर्ण करू शकतील मात्र पूर्वीप्रमाणेच बीएड अभ्यासक्रमात तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे व विज्ञान याशिवाय अध्यापन शास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांचा समावेश असेल.

तसेच ज्याप्रमाणे एक ज्वलंत पणती दुसरी पणती पेटवू शकते त्याप्रमाणे सक्षम शिक्षकच आपल्या विद्यार्थ्यांनाही क्षमता वृद्धी व सक्षमी करणासाठी सहाय्यभूत ठरतो. म्हणून तज्ञांच्या मते या शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक शिक्षकाला स्वतःचा व्यवसायिक विकास करण्याची संधी तर उपलब्ध आहेच याशिवाय शिक्षकांच्या कार्याची मानके निश्चित करून शिक्षकांना उच्च दर्जा प्राप्त व्हावा असे प्रयत्न करण्यात येतील. प्रत्येक शिक्षकाने आपल्या व्यवसायिक विकासासाठी किमान घड्याळी 50 तासांचा उपयोग करावा असे तज्ञ समितीचे मत आहे. या अंतर्गत शिक्षकांनी पूर्ण केलेले प्रशिक्षण वर्ग, त्यांनी केलेले लेखन, परिषदांमध्ये पेपर वाचन, परीक्षक म्हणून केलेले काम या बाबींचा समावेश होतो. पूर्वीपासून आजपर्यंत शिक्षक या बाबींमध्ये सहभाग नोंदवतच होते हे आपण जाणतो. परंतु एस.सी.ई.आर.टी. ने या बाबींचा उहापोह करणारी एक विशेष कार्यपद्धती राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने निश्चित केलेली आहे. ती लवकरच प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

## शाळा गुणवत्ता मूल्यांकनाचे बदलते स्वरूप :

आतापर्यंत शिक्षण क्षेत्रातील विविध स्तरानुसार मूल्यांकनाच्या वेगवेगळ्या पद्धती राबविण्यात येत असल्याचे आपण जाणतो. त्यातही संपूर्ण देशासाठी देशातील शिक्षण व्यवस्थेचे समग्र मूल्यमापन करणारी निश्चित अशी एक शाळा गुणवत्ता मूल्यांकनाची पद्धत अस्तित्वात नव्हती. वेगवेगळे राज्य त्यांच्या अधिनिस्थ शिक्षण संस्थांचे व गुणवत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी

वेगवेगळया पद्धती राबवत होते. जसे गुजरात कर्नाटक महाराष्ट्र यांच्या वेगवेगळया पद्धती होत्या. महाराष्ट्र राज्यात शाळांचे मूल्यांकन पूर्वी माझी समृद्ध शाळा या शीर्षकांतर्गत होत असे. नंतर शाळा सिद्धिच्या मानकानुसार आत्तापर्यंत म्हणजे 2024-25 पर्यंत शाळांचे मूल्यांकन आपण करत होतो या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार मात्र परिच्छेद क्रमांक 8.1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे शाळांचे गुणवत्ता मूल्यांकन हे आता शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा **SQAAF**याद्वारे करण्यात येईल. एकविसाव्या शतकातील स्पर्धात्मक युगात सर्व शाळा या आदर्श शाळा असायला हव्या. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक असा सर्वांगीण विकास शाळेमार्फत साध्य व्हावा, हे उद्दिष्ट राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा 2020 निर्देशित करते. या राष्ट्रीय धोरणात जुन्या मानांकना बरोबरच अधिक व्यापक व सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवून पूर्व प्राथमिक ते उच्च प्राथमिक शिक्षणाच्या सर्व टप्प्यांसाठी खाजगी आणि शासकीय शाळांचे मूल्यांकन आणि अधिस्वीकृती करण्यासाठी आवश्यक गुणवत्ता मानके सुनिश्चित करून **SQAAF** हे मार्गदर्शक साधन विकसित केले आहे.

पूर्वीच्या एन.पी.एस.एस.सी. अर्थात नॅशनल प्रोग्रॅम ऑफ स्कूल स्टॅंडर्ड एज्युकेशन म्हणजेच शाळा सिद्धि यात 7 डोमेन, 46 क्षेत्र व तीन स्तर शाळा मूल्यांकनासाठी वापरण्यात येत होते. तर आता या येऊ घातलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या मूल्यांकन साधनाद्वारे 6 डोमेन, 59 उपक्षेत्र, 128 गाभा मानके चार स्तरातून शाळेचे मूल्यांकन करतील. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद, पुणे यांनी यासंदर्भाने 'शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा'अशी मार्गदर्शक पुस्तिका देखील उपलब्ध करून दिलेली आहे. शिक्षण प्रक्रियेचा एक गाभा घटक म्हणून शिक्षणाची गुणवत्ता अत्यंत महत्त्वपूर्ण आहे ती केवळ स्वयंपूर्ण अथवा ओघाने येत नसते. अध्ययन अध्यापन प्रक्रिया, मूल्यमापन पद्धती, नेतृत्व व प्रशासन शाळेतील भौतिक सुविधा त्यांचा पर्याप्त वापर शाळेतील शिक्षणाचा दर्जा या सर्व बाबी शाळा मुलांकनात महत्त्वाच्या आहेत. शाळेच्या गुणवत्ता विकासासाठी सहाय्यभूत असलेल्या घटकांचे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ( एस. सी. आर. टी.) दरवर्षी शाळांचे स्वयं मूल्यांकन व त्यानंतर बाह्य मूल्यांकन करणार आहे. कोणत्याही नकारामक भावनेशिवाय मुक्त वातावरणात शाळांनी आपली बलस्थाने व दुर्बलता ओळखून सुधारणांसाठी योजना निर्धारित कराव्या असा सुपोषित उद्देश या मूल्यांकनाद्वारे शासनालाअभिप्रेत आहे.

## सारांश :

मानसशास्त्रीय दृष्टिकोन व बदलती जीवनशैली व आव्हाने यांना पूरक ठरणारे शिक्षण देशातील सर्व बालकांना मिळावे हाच दृष्टिकोन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 सादर करण्यामागे आहे. एकविसाव्या शतकातील हे पहिले शिक्षण धोरण आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर

शैक्षणिक धोरणांद्वारे आजच्या स्थितीतील साध्य शैक्षणिक विकास हा जरी समाधानकारक असला तरी जागतिक स्तरावरील गतिमान स्पर्धेशी जुळवून घेण्यासाठी त्यात बदल आवश्यकच होते. म्हणूनच क्षमता आधारित बालविकासाचे टप्पे विचारात घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय केंद्रस्थानी ठेवून निर्धारित केलेले हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वागतार्ह वाटते. डॉ. के. कस्तुरीरंगन हे एनईपी 2020 तयार करणाऱ्या समितीचे अध्यक्ष होते. आर.टी.आयअ‍ॅक्टचा समावेशक विचार करून या समितीने पूर्व प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत तसेच व्यावसायिक शिक्षणापर्यंत विस्तृतपणे अनेक गोष्टींचा विचार करून 484 पृष्ठांचा मसुदा 31 मे 2019 रोजी सादर केला होता. यावर समाजातील तज्ञांच्या सूचना देखील मागवल्या होत्या. त्या सूचनांचा देखील साधक-बाधक विचार करून मसुद्याला अंतिम रूप देण्यात आले. त्यामुळे येणाऱ्या कालखंडात भारताला एक जागतिक ज्ञान महासत्ता बनवून भारताचे एका न्याय आणि चैतन्य ज्ञान समाजात शाश्वतपणे परिवर्तन करण्यात हे धोरण नक्की सहाय्यभूत ठरेल असे विश्वास वाटतो.

## संदर्भ :

1) शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण 2.0 राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे जानेवारी 2025
2) शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण 2.0 राज्य अभ्यासक्रमा आराखडा शालेय शिक्षण 2024
3) राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर 2024
4) शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण 2.0 शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा
5) प्रभात वृत्तसेवा पुणे यातील संदर्भ लेख
6) मुंबई तरुण भारत संदीप वाघचौरे यांचा लेख
7) https://www.reserchgat.net
8) https://www.ssrn.com/abstract=4286350
9) https://www.mahamtb.com/encyc/2022/1/9/neu-education-policy.html
10) Government circulers, New National Education Policy 2020, published on various websites.